डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर
छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती, संचलित
कला विज्ञान व वाणिज्य निवासी महाविद्यालय
ता.सोयगांव जि.छत्रपती संभाजीनगर

मा.खा.रावसाहेब पाटील दानवे (अध्यक्ष) (माजी रेल्वे, कोळसा व खान केंद्रीय राज्यमंत्री)

मा.सौ.निर्मलाताई रावसाहेब पा.दानवे (सचिव) (छ.श्री.शिवाजी महाराज स्मारक समिती भोकरदन)

मा.आ.संतोष रावसाहेब पा.दानवे (भोकरदन जाफ्राबाद विधानसभा)
११ वी,१२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी १५ जून पासून प्रवेश सुरु
श्री.विजय देसाई : 9403251705

दैनिक

# अक्षराज

अचूक वेध,अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २९०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.०१ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## दिल्लीत वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या कॅन्टीनची इमारत कोसळली आतापर्यंत ६ मृत्यू, १२ जणांचं रेस्क्यू





**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, नवी दिल्ली :** दिल्लीतील साकेत परिसरात पाच मजली इमारत कोसळल्याची धक्कादायक घटना शनिवारी सायंकाळी घडली. या दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला असून १२ जणांना ढिगाऱ्याखालून बाहेर काढण्यात आले आहे. जखम ींपैकी १० जणांवर एम्स ट्रॉमा सेंटरमध्ये उपचार सुरू असून दोघांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

**वैद्यकीय विद्यार्थ्यांची कॅन्टीन कोसळली...**

दक्षिण दिल्लीचे डीसीपी अनंत मित्तल यांनी दिलेल्या माहितीनुसार, कोसळलेली इमारत वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या कॅन्टीनसाठी वापरली जात होती. त्यामुळे दुर्घटनेवेळी अनेक विद्यार्थी इमारतीत उपस्थित होते. अपघातानंतर काही विद्यार्थी ढिगाऱ्याखाली अडकल्याने बचाव पथकांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले.

एनडीआरएफ, अग्निशमन दल, डीडीएमए आणि दिल्ली पोलिसांनी संयुक्तपणे बचावकार्य हाती घेतले. जखमींना तातडीने रुग्णालयात पोहोचवण्यासाठी ग्रीन कॉरिडॉरही तयार करण्यात आला.

**दोषींवर कारवाईचा इशारा!**

घटनेनंतर दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी घटनास्थळी भेट दिली. अनधिकृत बांधकामांना परवानगी देणारे अधिकारी आणि बेकायदेशीर बांधकामात सहभागी असलेल्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला. त्यांनी सांगितले की, शहरातील धोकादायक आणि अनधिकृत इम ारतींची तपासणी करून जबाबदारांवर कारवाई करण्यात येणार आहे. दूरदर्शन भवनाजवळही दुर्घटनादरम्यान, दिल्लीत इमारती कोसळणारी ही काही पहिली घटना नाही. यापूर्वीही अशा अनेक घटनांनी शहर हादरले आहे. अनेकांचे त्यात जीवही गेले आहेत. आजच दिल्लीतील टिळक मार्ग परिसरात दूरदर्शन भवनाच्या इमारतीवरून दगड कोसळून नीरज कुमार (३५) हा तरुण गंभीर जखमी झाला. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले.

**दिल्लीत इमारती कोसळण्याच्या घटना वाढल्या...**

एप्रिल २०२५ मध्ये दिल्लीच्या मुस्तफाबाद परिसरात चार मजली इम ारत कोसळून ११ जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर जुलै २०२५ मध्ये वेलकम भागात चार मजली इमारत कोसळल्याने सहा जणांचा जीव गेला होता. आता साकेतमधील दुर्घटनेनंतर राजधानीतील जुन्या आणि अनधिकृत बांधकामांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## महानिर्मितीच्या कोराडी येथील स्थापत्य-२ विभागात 'हिटलरशाही'

● खुल्या निविदांमध्ये जितकी जास्त स्पर्धा होईल तितका महानिर्मिती कंपनीला आर्थिक लाभ होतो. मात्र, अधिकारी आणि राजकीय नेत्यांच्या या 'अभद्र युती' मुळे निविदा प्रक्रियेचा गळा घोटला जात असून महानिर्मिती कंपनीचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

या संपूर्ण गंभीर प्रकरणावर राज्याचे मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस व महानिर्मिती कंपनीचे वरिष्ठ अधिकारी काय धडक कारवाई करतात याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.३१, नागपूर :** महानिर्मिती कंपनीच्या कोराडी येथील स्थापत्य विभाग२ सद्या नियमबाह्य कारभाराचा व हिटलरशाहीचा कळस बघायला मिळत आहे. महानिर्मितीच्या सीएसआर फंडातून काढण्यात आलेल्या तब्बल २२ कोटी रुपयांच्या खुल्या निविदांमध्ये स्पर्धा रोखण्यासाठी आणि आपल्या मर्जीतील कंत्राटदारांना कामे देण्यासाठी आधीच रद्द करण्यात आलेली 'जिओ टॅगिंग'ची बेकायदेशीर अट पुन्हा घालण्यात आल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. या सर्व प्रकारामागे एका बड्या राजकीय नेत्याचा आदेश असल्याची चर्चा आहे. महानिर्मितीचे अधिकारी पूर्णपणे राजकीय नेत्यांच्या दबावाखाली काम करत असल्याचे चित्र आहे.

खुल्या निविदा प्रक्रियेत पारदर्शकता राहावी व अधिकाधिक स्पर्धा होऊन शासनाचा आर्थिक फायदा व्हावा यासाठी १८ ऑक्टोबर २०२३ रोजीच 'जिओ टॅगिंग'ची जाचक अट रद्द करण्यात आली होती. असे असताना निविदा प्रक्रियेत जियो टॅगिंग जाचक अट टाकण्यात आल्याने एकच गोंधळ उडाला आहे.

खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता यांच्याकडे कोराडीच्या स्थापत्य विभाग-२ चाही कारभार आहे पण खापरखेडा औष्णिक वीज केंद्रा मार्फत निघणाऱ्या ई-निविदा प्रक्रियेत मुख्य अभियंता यांनी जियो टॅगिंगची जाचक अट कधी टाकली नाही. मात्र, कोराडी वीज केंद्र स्थापत्य विभाग-२ अंतर्गत २२ कोटींचा सीएसआर फंड ई निविदा कामात नियमबाह्य जियो टॅगिंग जाचक अट टाकली कशी? असा संतप्त प्रश्न कंत्राटदारांकडून उपस्थित केला जात आहे. या निविदा प्रक्रियेतील धक्कादायक आणि गंभीर बाब म्हणजे २८ मे २०२६ रोजी सायंकाळच्या सुमारास खापरखेडा परिसरातील काही उत्सुक कंत्राटदार निविदेच्या प्रक्रियेनुसार प्रत्यक्ष साईट पाहणीसाठी स्थापत्य विभाग-२ कार्यालयात येथे गेले होते. मात्र, नवीन आणि बाहेरील कंत्राटदारांनी या प्रक्रियेत भाग घेऊ नये यासाठी हेतुपुरस्सर काही अधिकाऱ्यांनी स्थानिक कंत्राटदारांना बोलावून घेतले होते. स्थानिक गुंड प्रवृत्तीच्या कंत्राटदारांनी बाहेरील कंत्राटदारांवर दगडफेक केली, शिवाय त्यांच्या गाड्या फोडण्याचा प्रयत्न केला या हल्ल्यामुळे स्थापत्य विभाग-२ कार्यालय परिसरात सद्या भीतीचे आणि दहशतीचे वातावरण पसरले होते.

● कारखाना अधिनियमानुसार कोणत्याही कंपनीच्या एकूण उत्पन्नाच्या २% रक्कम सर्वसामान्य घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी खर्च करने अपेक्षित आहे. म हानिर्मितीचा सीएसआर फंड सर्व घटकासाठी आहे. मात्र, महानिर्मिती कंपनी कडून एक मायचा, एक मावशीचा असा भेदभाव केल्या जात असून कोराडी परिसरात महानिर्मिती कंपनीचा सीएसआर फंड कसा वाटप होतो आहे हे कळायला मार्ग नाही. खापरखेडा परिसरात अनेक सामाजिक कामे आहेत. मात्र, सीएसआर फंड खापरखेडा परिसराला का दिल्या जात नाही हे समजण्या पलीकडे आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सत्ताधारी एका बड्या राजकीय नेत्याच्या थेट आदेशावरून (QR) पात्रतेचा आणि जिओ टॅगिंगचा हा अजब खेळ रचला गेला. जेणेकरून विशिष्ट मर्जीतील कंत्राटदारांनाच ही २२ कोटींची कामे घरबसल्या मिळतील व बाहेरील कंत्राटदार स्पर्धेतून बाद होतील हे विशेष!

यासंदर्भात अधिकाऱ्यांकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही, उलट स्थापत्य-२ अंतर्गत कार्यरत स्थानिक कंत्राटदार गुंडांच्या माध्यम ातून दबावतंत्राचा वापर केल्या जात असल्यामुळे त्रस्त कंत्राटदारांनी आता आक्रमक भूमिका घेतली आहे. कंत्राटदार संघटनेने 'जिओ टॅगिंग'ची नियमबाह्य आणि बेकायदेशीर अट तात्काळ रद्द करण्यात यावी, २२ कोटी रुपयांच्या या खुल्या निविदा संपूर्ण पारदर्शकतेने नव्याने प्रकाशित कराव्यात, २८ मे रोजी कंत्राटदारांवर हल्ला करणाऱ्या गुंडांवर आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई व्हावी अशी मागणी केली आहे

यासंदर्भात तात्काळ तोडगा काढणे अपेक्षित आहे. अन्यथा कंत्राटदारांना न्याय मिळाला नाही तर या भ्रष्ट कारभारा विरोधात थेट उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचा कडक इशारा कंत्राटदारांनी दिला आहे.

## चंद्रपूर जिल्ह्यात रानटी हत्तींच्या कळपाचा थरार

### वन विभागाकडून नागरिकांना हाय- अलर्ट !



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३१, सावली (चंद्रपूर) :** चंद्रपूरच्या सावली तालुक्यात रानटी हत्तींच्या एका मोठ्या कळपाने प्रवेश केला असून यामुळे परिसरात कमालीची दहशत पसरली आहे. सावली तालुक्यातील करोली, आकापूर, खानबाद व सायखेडा या वनपरिक्षेत्राला लागून असलेल्या गावांमध्ये या हत्तींच्या हालचाली वाढल्या आहेत. हत्तीचा हा कळप शेतपिकांचे नुकसान करण्याची आणि मानवी वस्तीच्या जवळ येण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून वन विभागाने तात्काळ पावले उचलत परिसरातील नागरिकांना हाय-अलर्ट जारी केला आहे. वन विभागाने नागरिकांसाठी काही अत्यंत महत्त्वाच्या आणि विशेष सूचना जारी केल्या आहेत. जंगलाच्या दिशेने जाताना नागरिकांनी गट करून जावे आणि रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणे टाळावे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, अनेकदा लोक हत्तींना पाहण्यासाठी, त्यांचे फोटो काढण्यासाठी किंवा व्हिडिओ बनवण्यासाठी त्यांच्या अगदी जवळ जाण्याचा प्रयत्न करतात. मात्र, रानटी हत्तींच्या बाबतीत असे करणे अत्यंत जीवघेणे ठरू शकते. त्यामुळे वन विभागाने नागरिकांना हत्तींच्या जवळ न जाण्याचे आणि सुरक्षित अंतर राखण्याचे सक्त आवाहन केले आहे.

प्रशासनाने गावकऱ्यांना विनंती केली आहे की, सोशल मीडिया किंवा इतर माध्यमांतून पसरणाऱ्या कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका. वन विभागाचे कर्मचारी या कळपावर २४ तास बारीक लक्ष ठेवून आहेत. क्षेत्रात कोणत्याही प्रकारची आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास किंवा हत्तींचा थेट सामना झाल्यास तात्काळ वन विभागाच्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा.

## बोरीत उष्णतेचा कहर; कडब्याच्या पेंड्याला आग, ग्रामस्थांच्या तत्परतेने मोठी हानी टळली



**अक्षराज : जाफर शेख**

**दि.३१, बोरी (परभणी) :** बोरी येथील कापड उद्योग व्यावसायिक कैलास नवाळ यांच्या शेतामध्ये आज (दि.३१) सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास कडब्याच्या पेंड्याला अचानक आग लागली. या घटनेमुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली.

शेजारील व्यावसाईक इरफान खान पठाण यांच्या निदर्शनास ही आग आल्यानंतर त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदत कार्य केले. त्यांनी परिसरातील नागरिकांना माहिती दिली त्यानंतर ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने घटनास्थळी दाखल झाले आणि सर्वांनी मिळून आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले.

ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे आग अधिक पसरली नाही आणि मोठे नुकसान टळले. या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसून, केवळ कडब्याचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. सध्या उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली असून परिसरातील तापमान ४३ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे वाढत्या उष्णतेमुळे ही आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत शेतकरी व नागरिकांनी कडबा, चारा तसेच इतर ज्वलनशील वस्तूंच्या साठ्याजवळ विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.

## ब्राह्मणी खून प्रकरणात आरोपी जेरबंद; पाच दिवसांची पोलीस कोठडी

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.३१, राहुरी :** राहुरी तालुक्यातील ब्राह्मणी येथील खून प्रकरणातील आरोपीला राहुरी पोलिसांनी अटक केली असून माननीय न्यायालयाने त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, फिर्यादी अलका सत्यवान साठे (वय २२, रा. ब्राह्मणी, ता. राहुरी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ६०९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १०३(२), ११५(२), ३५१(२) व ३५२ अंतर्गत दि. २७ मे २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.



या प्रकरणातील आरोपी सुशील मधुकर साठे (रा. ब्राह्मणी, ता. राहुरी) याला राहुरी पोलीस पथकाने ताब्यात घेऊन अटक केली. अटक केलेल्या आरोपीस दि. २८ मे २०२६ रोजी माननीय न्यायालयासमोर हजर करण्यात आले. सरकारी पक्षाच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने आरोपीस दि. १ जून २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास राहुरी पोलीस करत असून गुन्ह्याच्या अनुषंगाने अधिक माहिती व पुरावे संकलित करण्याचे काम सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर तसेच राहुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या म ार्गदर्शनाखाली करण्यात आली.

सदर कारवाईत पोलिस उपनिरीक्षक समाधान फडोळ, पोलीस कॉन्स्टेबल रवींद्र कांबळे, पोलीस हवालदार राठोड, पोलीस हवालदार कुदळे, पोलीस हवालदार जिने, पोलीस हवालदार निकम तसेच पोलीस हवालदार गायकवाड यांनी सहभाग घेतला.




## लालपरीला वाढदिवसाच्या शुभेच्छा !

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या एसटीचा आज म्हणजे १ जूनला ७८ वा वाढदिवस आहे. १ जून १९४८ रोजी पुणे - नगर या मार्गावर पहिली एसटी धावली होती. आज एसटी महामंडळाचा विस्तार झाला आहे. गाव तेथे एसटी, रस्ता तिथे एसटी या ब्रीदवाक्यनुसार एसटीचा विस्तार होत गेला. गावागावात आज एसटी पोहचली आहे. एकूण ३१ विभागातून एसटीचे कामकाज केले जाते त्याचप्रमाणे आंतरराज्यीय सेवा देखील पुरवली जातेय. कर्नाटक, गोवा, आंध्रप्रदेश, तेलंगणा, गुजरात, मध्यप्रदेश या राज्यात आज एसटी पोहचली आहे. राज्यातील कोट्यवधी प्रवाशांच्या लाडक्या लालपरीने काळानुसार कात टाकली असून, अनेक बदलही केले आहेत. लालपरीपासून हिरकणी, शिवनेरी, शिवशाही आता विठाई असा एसटीचा चेहरामोहरा बदलत गेला आहे. एसटी म्हणजे केवळ प्रवाशांची वाहतूक एव्हढेच मर्यादित नसून एसटीने सातत्याने सामाजिक बांधिलकी जपली आहे. राज्यावर आलेल्या भूकंप, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीत एसटीने नेहमीच मदतीचा हात पुढे केला आहे. मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात राहता यावे यासाठी एसटीने पुढाकार घेत प्रवासात सवलती दिल्या आहेत. खेड्यापासून शाळा कॉलेजमध्ये जाण्यासाठी विद्यार्थ्यांचे हक्काचे वाहन म्हणजे एसटीच. ग्रामीण भागातील करोडो विद्यार्थ्यांचे शिक्षण केवळ एसटीमुळेच पूर्ण होऊ शकले. म्हणूनच राज्यातील करोडो प्रवाशांच्या मनात एसटी विषयी आदराची भावना आहे. एसटी म्हणजे ग्रामीण भागासाठी वरदानच आहे. ग्रामीण भागात आजही एसटी हेच दळणवळणाचे प्रमुख साधन आहे. जनतेचा प्रवास सुखकर व्हावा, प्रवाशांना तत्पर आणि वक्तशीर सेवा मिळावी यासाठी एसटीचे कर्मचारी झटत असतात पण गेल्या काही वर्षांपासून एसटी महामंडळ तोट्यात असल्याने एसटी कर्मचाऱ्यांचे भवितव्य अंधकारात बुडाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून एसटी महामंडळ तोट्यात आहे त्यामुळे महामंडळाने नवीन कर्मचाऱ्यांची भरती केलेली नाही. कंत्राटी पदे भरून एसटीचे खाजगीकरण करण्याचा अट्टाहास केला जात आहे त्यामुळे कर्मचारी आणि महामंडळ यांच्यातील वाद विकोपाला गेला आहे या वादात प्रवाशी मात्र भरडले जात आहेत म्हणूनच सरकारने एसटीच्या खाजगिकरणाचा अट्टाहास सोडून एसटीला सशक्त करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. कंत्राटी ऐवजी कायमस्वरूपी कर्मचारी नेमून त्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन आणि सुविधा दिल्यास महामंडळाला पुन्हा सुगीचे दिवस येतील. प्रवाशांच्या मनात एसटी विषयी आपुलकीची आणि आदराची भावना आहे. सरकारनेही एसटी कडे आपुलकीने पाहिल्यास एसटीला पुन्हा गतवैभव प्राप्त होईल. राज्यातील प्रवाशांच्या मनात मानाचे स्थान असलेल्या आणि सर्वांच्या लाडक्या लालपरीला म्हणजेच एसटीला ७८ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**– श्याम ठाणेदार**

## तंबाखूविक्रीवर बंदी आणावी !

जागतिक तंबाखूमुक्ती दिन नुकताच सरला. भारतात तंबाखू आणि धुम्रपानामुळे होणाऱ्या मृत्यूची टक्केवारी वर्षागणिक वाढते आहे. तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या निर्मिती आणि विक्रीवर भारतात दुर्दैवाने कोणतेच निर्बंध नाहीत. तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीतून मोठ्या प्रमाणात महसूल मिळत असल्याने अशा पदार्थांवर बंदी आणण्याची सरकारची मानसिकताही नाही. परिणामी या पदार्थांच्या नियमित सेवनामुळे अपंगत्व येण्याचे, कर्करोगासारखे गंभीर आजार होण्याचे आणि मृत्यूचे प्रमाण देशात दिवसागणिक वाढते आहे. तंबाखूजन्य पदार्थांच्या वेष्टनांवर वैधानिक इशारा छापण्याची सक्ती करण्यात आलेली असली तरी व्यसन जडलेल्यांना याचे काहीच सोयरसुतक नसते. मृत्यूदर घटवण्यासाठी एकीकडे वैद्यकीय क्षेत्रात नवनवीन संशोधन सुरू आहे , तर दुसरीकडे मृत्यूकडे घेऊन जाणाऱ्या तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीला सरकार प्रोत्साहन देत आहे. मोठमोठे सिने अभिनेते आणि खेळाडू लोकांना जाहिरातींच्या माध्यमांतून गुटखा आणि तंबाखू खाण्याचे आवाहन करत आहेत. तंबाखूसारखे पदार्थ माणसाचे व्यक्तिमत्व बिघडवण्याचेही काम करते. चारचौघांत तंबाखू मळून खाणाऱ्यांकडे सुशिक्षित समाज तुच्छतेनेच पाहतात. तंबाखू चघळून जागोजागी तोंडाची पिचकारी मारणारे महाभाग शासनाच्या 'स्वच्छ भारत मोहिमे'चे सर्वांत मोठे शत्रू बनले आहेत. जीएसटी आणि अन्य माध्यमांतून सरकारच्या तिजोरीत आज मोठ्या प्रमाणात धन गोळा होत असल्याचा दावा विद्यमान सरकारकडून केला जात आहे, मग दरवर्षी लाखो माय लेकींचे संसार उध्वस्त करणाऱ्या आणि लाखो मूला मुलींच्या डोक्यावरील छत्र हरपवण्यास कारणीभूत असलेल्या तंबाखूवर बंदी आणून सरकार थोड्याशा महसुलावर पाणी सोडण्याची उदारता का दाखवत नाही. गुटखविक्रीवर बंदी घालण्यात आली तेव्हा तत्कालीन राज्य सरकारच्या निर्णयाचे सर्वच स्तरातून स्वागत करण्यात आले होते. तंबाखूवर बंदी आणून सरकारने आणखी एक ऐतिहासिक पाऊल उचलावे.

**– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

# महाराष्ट्र नशामुक्त व्हावा, असे सरकारला खरंच वाटते का ?




महाराष्ट्राला पडत चाललेला अमली पदार्थांचा विळखा आणि त्याला बळी पडत चाललेली आजची तरुण पिढी यांची सुटका करण्यासाठी आणि जनमानसांत जागृती व्हावी यासाठी २५ जूनपासून राज्यात 'नशामुक्त महाराष्ट्र अभियान' राबवण्यात येणार आहे. या अभियानात सर्व लोकप्रतिनिधी, शैक्षणिक संस्था तसेच सामाजिक संस्था यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन मुंबई उपनगरचे पालकमंत्री आशिष शेलार आणि सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले आहे. या अभियानाच्या अंतर्गत शाळा,महाविद्यालये आणि विविध सामाजिक स्तरांवर व्यापक जनजागृती करण्यात येणार असून आजच्या पिढीला व्यसनमुक्त जीवनशैलीकडे प्रेरित करण्यासाठी विविध उपक्रमही या माध्यमातून राबवण्यात येणार आहेत.

पिंपरी चिंचवड परिसरात घडलेल्या विषारी दारू कांडाने समस्त महाराष्ट हादरला आहे. या दारूने आजपर्यंत २३ हून अधिक बळी घेतले आहेत. विद्येचे माहेरघर समजले जाणारे पुणे आजमितीला अमली पदार्थाचे प्रमुख केंद्र बनले आहे. मागील १० वर्षांत अमली पदार्थविरोधी पथकाने केवळ पुण्यातून ३७ हजार कोटीहून अधिक किमतीचे अमली पदार्थ हस्तगत केले आहेत. यापेक्षा कितीतरी अधिक पटीने ते वितरित झाले आहेत. पुण्यातील कोंढवा, विमाननगर, कोरेगाव पार्क आणि पिंपरी-चिंचवड हे परिसर आज अमली पदार्थांच्या विक्रीची प्रमुख केंद्रे बनली आहेत. गेल्या १० वर्षांत पुण्यात चोऱ्या, दरोडे, खून, टोळीयुद्ध यांचे प्रमाणही कमालीचे वाढले असून यामागेही अमली पदार्थांचे सेवन हेच प्रमुख कारण समोर येत आहे. पुण्यात अमली पदार्थविरोधी पथकाने ज्या कारवाया केल्या त्यांमध्ये शाळकरी मुलांच्या दफ्तरांमध्येही अमली पदार्थ आढळले होते यावरून पुण्याला अमली पदार्थाचा किती मोठया प्रमाणात विळखा पडला आहे याची कल्पना येते. पुण्यासह मुंबई, ठाणे आणि राज्यातील प्रमुख शहरांमध्ये कमी अधिक प्रमाणात हीच अमली पदार्थ बनवणारे, ते राज्यभरात पसरवणारे आणि लोकांमध्ये वितरित करणारे यांचे मजबूत जाळे आज राज्यात तयार झालेले आहे. आजतागायत मुंबई, ठाणे आणि पुण्यात कितीतरी मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत मात्र तरीही हे नेटवर्क काही बंद पडलेले नाही.

मद्यविक्रीतून दरवर्षी राज्यांना मोठ्या प्रमाणात महसूल मिळत असल्याने कोणतेही राज्य सरकार आपल्या राज्यात दारूबंदी करण्यास अनुकूल नसते. तरीही दारूमुळे होणारी सामाजिक हानी लक्षात घेऊन बिहार, गुजरात, मिझोराम, नागालँड, मणिपूर आदी राज्यांत तर काही राज्यांतील गावांत आणि तालुक्यांत संपूर्ण दारूबंदी करण्यात आली आहे. महाराष्ट्रातही दारूबंदी करण्याची मागणी मागील अनेक वर्षांपासून विविध सामाजिक संघटना, महिला विकास मंडळे करत आहेत, मात्र सरकार त्याकडे लक्ष द्यायलाही तयार नाही. उलट मद्यविक्रीतून मिळणाऱ्या महसुलात वाढ व्हावी यासाठी सरकार मद्यविक्रीचे नवीन परवाने वाटत आहे. महाराष्ट्रात केवळ २ रुपयांत एक दिवस देशी दारू पिण्याचा परवाना मिळतो तर ५ रुपयांत विदेशी दारू ढोसण्याची अनुमती मिळते. १०० रुपये घेऊन सरकार दारुड्यांना वर्षभर दारू ढोसण्याची परवानगी देते तर १००० रुपयांत जीवनभर दारू पिण्याची अनुमती मिळते. ख्रिस्ती नववर्षाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकार दरवर्षी २४, २५ आणि ३१ डिसेंबर या तीन दिवशी पहाटे ५ वाजेपर्यंत मद्याची दुकाने, बिअर बार्स, पब्स आणि परमिट रूम्स चालू ठेवण्याची परवानगी देते. या तीन दिवसांत कोट्यवधी लिटर दारू रिचवली जाते. अति मद्यसेवनामुळे या दिवसांत कितीतरी ठिकाणी अपघात घडतात. या अपघातात कितीतरी निरपराधांचे बळी जातात तर कितीतरी आयुष्यभरासाठी जायबंदी होतात. ३१ डिसेंबरच्या रात्री विनयभंगाचे आणि छेडछाडीचे प्रसंगही मोठ्या प्रमाणात घडतात. ३१ डिसेंबरच्या निमित्ताने शेकडो तरुण अन्य मित्रांच्या हट्टामुळे पहिल्यांदा दारूचा ग्लास ओठाला लावतात आणि त्यातील कितीतरी जण पुढच्या वर्षीच्या अखेरीपर्यंत अट्टल मद्यपी झालेले असतात. राज्यात अधिकाधिक मद्यपी निर्माण व्हावेत आणि राज्यात मोठ्या प्रमाणात दारू विकली जाऊन त्यातून सरकार दरबारी कोट्यवधींचा महसूल गोळा व्हावा हाच कदाचित सरकारचा यामागचा हेतू असावा. २०२५ च्या डिसेंबरमध्ये 'सनबर्न फेस्टिव्हल'ला मुंबईत परवानगी देऊन सरकारने हा हेतू अधिकच स्पष्ट केला. म्युझिकल शोच्या नावावर आयोजित केल्या जाणाऱ्या या कार्यक्रमात तरुणाईला नशेच्या आहारी जाण्यासाठी अनुकूल वातावरण तयार केले जाते. गोव्याने या कार्यक्रमाला हद्दपार केल्यानंतर महाराष्ट्र सरकारने मात्र त्याकरिता अक्षरशः पायघड्या घातल्या. पुणे नंतर मुंबईतील शिवडी येथील पोर्ट ट्रस्टच्या जमिनीवर हा फेस्टिव्हल आयोजित करण्याची सरकारने परवानगी दिली. त्यासाठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या सोयी सुविधा सरकारकडून जातीने पुरवण्यात आल्या. राज्यातील कित्येक विद्यार्थी संघटना, सामाजिक संस्था,नशामुक्ती केंद्रे यांनी या कार्यक्रमाला कडाडून विरोध केला, सरकार दरबारी निवेदने दिली, सनदशीर मार्गाने आंदोलने केली मात्र या सर्वांना केराची टोपली दाखवत सरकारने कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवून हा कार्यक्रम पार पडू दिला, या कार्यक्रमात १६ वर्षांपासूनच्या अल्पवयीन मुला-मुलींना प्रवेश देण्यात आला होता. गोवा राज्याचा साडेसहा कोटींचा महसूल बुडवणाऱ्या या महोत्सवाला महाराष्ट्र सरकारने केवळ परवानगीच दिली नाही तर त्याला विरोध करणाऱ्यांनी कार्यक्रमात कोणताही व्यत्यय आणू नये याचीही पुरती व्यवस्था केली.

महाराष्ट्रात २०१२ साली गुटखाबंदी लागू करण्यात आली. आजमितीला ही गुटखाबंदी केवळ कागदावरच असल्याचे चित्र दिसत आहे. शहरी भागात पानाच्या लहान मोठ्या टपऱ्यांवर, किराणा मालाच्या छोट्या दुकानांमध्ये आज सर्रासपणे गुटखा विकला जात आहे. शाळा महाविद्यालय परिसरातील टपऱ्यांवरही गुटखा सहज उपलब्ध होत असल्याने शाळकरी मुले आणि महाविद्यालयीन तरुण गुटख्याच्या आहारी जाऊ लागली आहेत. कोरोनाकाळात जिथे जीवनावश्यक वस्तू मिळणे मुश्किल होते अशा भागांत गुटख्याची पाकिटे चढ्या दराने विकली जात होती. अनेक ठिकाणी स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने पान टपऱ्यांवर दर्शनी भागात चिप्सच्या पाकिटांप्रमाणे विविध कंपन्यांची गुटख्याची पाकिटे लटकवलेली दिसून येतात. गावांमध्ये रेल्वेच्या पॅसेंजर गाड्या थांबतात तेव्हा जवळच्या परिसरातील तरुण गुटखा, सिगारेट आणि तंबाखूची पाकिटे विकण्यासाठी गाडीत बिनधास्तपणे फिरतात. प्रवासीसुद्धा यांच्याकडून मोठ्या प्रमाणात खरेदी करतात. अन्न व औषध प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी आणि भ्रष्ट पोलीस यंत्रणा यांमुळे राज्यभर गुटखा पुरवण्याचे छुपे जाळे निर्माण झाले आहे. दरवर्षी विविध ठिकाणी धाडी टाकुन कोट्यवधीचा गुटखा जप्त केला जातो; मात्र ही कारवाई केवळ दाखवण्यापुरती असते असे जाणकारांचे मत आहे.

प्रमुख शहरांसह राज्याला पडलेला अमली पदार्थांचा विळखा सोडवण्यात राज्य सरकार पुरते अपयशी ठरले आहे. राज्यात दारूबंदी करण्याऐवजी सरकार मद्यविक्रीला प्रोत्साहन देण्याचे काम करत आहे. पब्स, बार्स, परमिट रूम्स यांना मान्यता देऊन सरकार नशेखोरीलाच चालना देत आहे. सिगारेटच्या पाकिटांवर त्यापासून होणारे धोके छापल्यावर लोक सिगारेट पिणे सोडतील हा भ्रम लोकांमध्ये निर्माण करून विविध ठिकाणी स्मोकिंग झोनना परवानगी देत आहे. राज्यात गुटखाबंदी आहे कि नाही हा प्रश्न तर आज राज्यातील समस्त नागरिकांना पडला आहे. गुटखा आणि पान मसाल्याच्या जाहिराती राजरोसपणे सुरु आहेत. ४ बाय ४ फुटाच्या दिसणाऱ्या पानटपऱ्या आज हायफाय झाल्या आहेत. या टपऱ्यांतून नक्की पानच मिळते कि आणखी काही, याची माहिती पोलिसांना का नसावी हाही एक प्रश्नच आहे. एकीकडे हे सर्व राजरोसपणे चालू आहे आणि दुसरीकडे सरकार राज्यभर 'नशामुक्त महाराष्ट्र अभियान' राबवण्याची सिद्धता करत आहे. हे अभियान नक्की लोकांच्या हितासाठी कि सरकारचे अपयश झाकण्यासाठी ? अशा अभियानातून राज्य नशामुक्त होईल की सरकारला आणखी काही करायला हवे याचे उत्तर न कळायला राज्याची जनता नक्कीच दूधखुळी नाही !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

## हात सफाई

मान्सून दारात उभा
जोरात नाले सफाई
टेंडर काढा मोठ्ठाले
करु या हात सफाई

संगनमते जमवायचे
ठेकाही सग्याला देई
दूर दर्शी ते नियोजन
तुंबड्या तुंबडूनि घेई

तहान लागताविहीर
नेहमीच घिसाडघाई
सुसंपन्न नालेसफाई
प्रमाणपत्र देता घाई

बीले टरा टरा फाडा
खाई लज्जत मलाई
मालदार सारे व्हावे
मिळो खूपसे मलाही

पाऊस पडे धनाचा
होई सर्वांची भलाई
फाटल्या छप्परांची
सामान्यकरे शिलाई

दोष द्यायचा निसर्गा
कुठे ही होता तुंबाई
साहेब नामा निराळा
कामगारचं दोषीबाई

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# सगळी नाती सांभाळणे ही एक कला !

आजच्या स्वार्थी दुनियेत नात्यांमध्ये कटुता फार वाढली आहे. गरजेनुसार व अडचणीनुसार नात्यांची आठवण काढली जात आहे. जे नातेवाईक कोणत्या कामासाठी उपयोगाला येत नाहीत त्यांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकले जात आहे. आई वडील असोत की भाऊ बहिणी असोत त्यांच्या कडून कोणता आर्थिक लाभ होणार नसेल तर त्यांना गौण समजले जात आहे. आणि स्वार्थ साधण्यासाठी व अडचणींची सोडवणूक करण्यासाठी नवीन स्वार्थी नाते निर्माण केले जात आहेत. लग्नकार्यात आणि इतर समारंभात रक्ताच्या नातेवाईकांना डावलून, दूर्लक्षित करून स्वार्थी व तकलादू नातेवाईकांना मान सन्मान देण्याचा पायंडा पाडला गेला आहे.असे असले तरीही फार थोडे लोक आपल्या सगळ्या नातेवाईकांना जीवापाड सांभाळतात. सगळी नाते मनोभावे जपतात. नाते सांभाळणे ही एक कला आहे ती कला सर्वांना जमत नाही.

आई वडील, भाऊ बहिणी, आजी आजोबा, चुलता चुलती, आत्या मामा, मावशी काका, मामा मामी, जाऊबाई, भावजय, नणंद, भाच्चा भाच्ची ही काही प्रमुख नाते आहेत. याच नात्यांमध्ये सध्या कटुता निर्माण होऊन नात्यांतील गोडवा व मायेचा ओलावा आटत चालला आहे. फार क्षुल्लक कारणांवरून आणि मानपान सांभाळण्यावरून या सर्व नात्यांमध्ये अंतर पडत चालले आहे. नात्यांना जपण्याऐवजी ती धिक्कारली जात आहेत. लोकांच्या मनात स्वार्थ बोकाळला आणि नाती दुरावत गेली आहेत. आई वडिलांची संपत्ती वाटून घेण्यावरून भावा भावाची, बहिण भावाची भांडणे होत आहेत.संपत्ती वाटणीचा वाद



विकोपाला जाऊन कोर्टात एकमेकांविरुद्ध दावा ठोकला जात आहे.श्रीमंत नातेवाईक आणि गरीब नातेवाईक असे वर्गीकरण करून लोक स्वार्थाप्रमाणे नात्यांचा वापर करण्यात पटाईत झाले आहेत. माणुसकी जपणारे नातेवाईक आणि माणुसकीची खिल्ली उडवणारे नातलग असे दोन गट सध्या पहायला मिळतात.

बढाया मारणारे आणि मोठेपणाचा टेंभा मिरवणारे नातेवाईक एकीकडे आणि साधेपणाने जीवन जगणारे चांगल्या विचारांचे नातेवाईक दुसरीकडे असे दोन टोकांचे नेतृत्व करणारे नातेवाईक सर्रास पाहायला मिळतात.काही लोक श्रीमंत नातेवाईकांच्या लग्नकार्यात आवर्जून उपस्थित राहतात परंतु आपल्या पेक्षा गरीब असणाऱ्या नातेवाईकांच्या कोणत्याही कार्यक्रमाला जाणे टाळले जाते.

काही नातेवाईक मात्र दुटप्पी भूमिका न घेता आपल्या सर्व नातेवाईकांना जीव लावण्याची व ती सर्व नाती जीवापाड जपण्याची खबरदारी घेतात. परोपकार भाव आणि एकमेकांना मदत करण्याची वृत्ती बाळगून सर्व नातलगांना समान लेखणे, कोणाला कमी न समजणे आणि सर्व नातेवाईकांना आग्रहाचे निमंत्रण देणे ही पथ्ये कटाक्षाने पाळली जातात. सर्व नातेवाईकांच्या संपर्कात राहणे, त्यांना फोन करून ख्यालीखुशाली विचारणे, सण उत्सवाला आग्रहाने बोलावणे, गरजू नातेवाईकांना सढळ हाताने मदत करणे आणि सर्वच नातेवाईकांना समान लेखणे हे धोरण बाळगून सर्व नातलगांना जीवापाड जपले जाते. वृध्द आई वडिलांचा सांभाळ करणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे, बहिण भावावर जीव ओवाळून टाकणे, इतर नातेवाईकांना मान सन्मान देणे आणि सर्वांची आस्थेवाईकपणे विचारपूस करणे ही माणुसकी जपण्याची एक उत्कृष्ट कला आहे.ही कला ज्यांना ज्यांना जमते ते आपल्या सर्व नातेवाईकांना जीव लावतात, माणुसकीचे दर्शन घडवतात. शक्यतो गरीब माणसे व स्वभावाने निर्मळ असणारी माणसे या कलेत फार निपून असतात. स्वार्थाने बरबटलेल्या या निर्दयी जगात ज्यांना सर्व नातेवाईकांना प्रामाणिकपणे जपण्याची व त्यांच्या मदतीला धावून जाण्याची वृत्ती ज्यांच्या अंगी असते त्यांची समाजाला व देशाला फार गरज आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

जीव लावणे माणुसकीने
नाही जमत सगळ्यांना
सर्व नातेवाईकांना जपण्याची
कला नसते जमत सर्वांना
नात्यांमधला गोडवा जपणे
हे एक आव्हान आहे
माणसाने माणसासम वागणे
माणुसकीचे खरे नाते आहे

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर मो.९७३०९३९७३२**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# पर्यटकांनी बहरले महाबळेश्वर!



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.३१, महाबळेश्वर :** महाबळेश्वर हे थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असून जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ आहे येथे दरवर्षी उन्हाळी हंगामात लाखो पर्यटक भेट देत असतात. उन्हाळी सुट्ट्याच्या पार्श्वभूमीवर महाबळेश्वर येथे पर्यटकांची मोठी गर्दी होत असून संपूर्ण शहर पर्यटकांनी फुलून गेले आहे. राज्यासह देशाच्या विविध भागांतून आलेल्या पर्यटकांमुळे बाजारपेठा, पर्यटनस्थळे, हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्स गजबजून गेली आहेत. वेण्णा तलाव, एलिफंट्स हेड पॉइंट, केट्स पॉइंट, लिंगमळा धबधबा आणि विविध निसर्गरम्य स्थळांवर पर्यटकांची विशेष गर्दी पाहायला मिळत आहे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत वाहनांच्या रांगा लागत असून स्थानिक व्यावसायिकांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे.

पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे हॉटेल व्यवसाय, घोडेस्वारी, बोटिंग तसेच स्थानिक उत्पादनांच्या विक्रीला चालना मिळाली आहे. स्ट्रॉबेरी, मध, चने, जाम आणि इतर स्थानिक उत्पादनांच्या खरेदीसाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात बाजारपेठेत गर्दी करत आहेत.

पर्यटक गरामा गरम मकई,मकई पॅटीस, स्ट्रॉबेरी विथ क्रिम व इतर खाद्यपदार्थांवर ताव मारताना दिसत आहेत वेण्णा लेक येथे नौका विहाराचा आनंद घेताना दिसत आहेत वातावरण धुकेमय झाले असून गुलाबी थंडी चा आनंद पर्यटक घेत आहेत. आपल्या प्रियजनांना भेटवस्तू देण्याकरीता खरेदी करताना दिसत आहेत.

# समाजहितासाठी बारी समाजाची सकारात्मक पुढाकार बैठक संपन्न



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, सोयगाव :** शिरसोली प्र.न. व शिरसोली प्र.बो. येथील सूर्यवंशी बारी पंच मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने समाजातील वाढत्या अनिष्ट चाली-रीतींवर नियंत्रण आणण्यासाठी महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. समाजातील लग्नकार्य, साखरपुडा व इतर सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये वाढत चाललेल्या अनावश्यक खर्चिक व सामाजिकदृष्ट्या घातक प्रथांवर सखोल चर्चा करण्यात आली.

या बैठकीत समाजामध्ये वेळेवर लग्न लावणे, वैदिक पद्धतीने एकाच वेळेत विवाह पार पाडणे, मेहंदी व प्री-वेडिंग शूट यांसारख्या नव्याने सुरू झालेल्या खर्चिक प्रथा बंद करणे, लग्नातील बॅनरबाजी थांबवणे, महिलांनी सार्वजनिक ठिकाणी फेटे बांधून नृत्य करण्यास मर्यादा ठेवणे, साखरपुडा सकाळी १२ वाजेच्या आत घेणे तसेच वाजंत्रीस वेळेचे बंधन ठेवणे अशा विषयांवर सकारात्मक चर्चा झाली.

समाजात साधेपणा, संस्कार आणि आर्थिक बचत यांचे महत्व टिकवण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यातील बारी समाज पंच मंडळांची एकत्रित बैठक घेण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार रविवार दिनांक ०७ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता शिरसोली प्र.बो. येथील समाज मंगल कार्यालयात मोठ्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

**समाजहितासाठी एक सकारात्मक पाऊल : सूर्यवंशी**

बारी समाजातील वाढत्या अनिष्ट व खर्चिक चाली-रीतींवर नियंत्रण आणण्यासाठी शिरसोली प्र.न. व शिरसोली प्र.बो. पंच मंडळांनी एकत्र येऊन महत्वपूर्ण निर्णय प्रक्रिया सुरू केली आहे.

समाजात साधेपणा, संस्कार, आर्थिक बचत आणि सामाजिक शिस्त टिकवण्यासाठी सर्व समाज बांधवांनी एकत्र येणे ही काळाची गरज आहे. लग्न समारंभ साधेपणाने व संस्कारपूर्वक व्हावेत, समाजात अनावश्यक दिखावा कमी व्हावा आणि पुढील पिढीला चांगले संस्कार मिळावेत हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे.

या उपक्रमासाठी पारोळा, अमळनेर, चोपडा, यावल, रावेर, ऐनपूर, भुसावळ, सोयगाव, आमखेडा, शेंदुर्णी, पहूर, पहूर पेठ, कुऱ्हा आदी ठिकाणी बैठका घेण्यात आल्या असून बऱ्हाणपूर, बांभाडा, शहापूर व अंतुर्ली येथे दूरध्वनीद्वारे चर्चा करण्यात आली.

बैठकीस रतन काटोले, चंद्रकांत अस्वार, लक्ष्मण नाईक, दिगंबर बारी, गिरीश वराडे, राजेश आंबटकर यांच्यासह सोयगाव व आमखेडा येथील समाज बांधव उपस्थित होते.

तसेच आमखेडा तालुका बारी समाजाचे अध्यक्ष डॉ. रघुनाथ काशीराम फुसे, उपाध्यक्ष गजानन लक्ष्मण ढगे, सहसचिव मनोज रघुनाथ आगे, सचिव रामदास लाडूबा फुसे तसेच सोयगाव तालुका बारी समाजाचे अध्यक्ष हरिदास रामदास काटोले, उपाध्यक्ष राजेंद्र तुकाराम फुसे, सचिव गणेश पांडुरंग आगे, उपसचिव दत्तात्रय गोविंदा काटोले यांच्यासह विश्वनाथ आगे, शंकर ढगे, एकनाथ बोडखे, समाधान भाऊ आगे, राजेंद्र दामधर आदी मान्यवर उपस्थित होते.

समाजामध्ये चांगल्या परंपरा टिकवून साधेपणा, संस्कार आणि एकोपा जपण्यासाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे.

समाजाच्या हितासाठी घेतलेल्या या निर्णय प्रक्रियेस सर्वांनी सहकार्य करून एकजूट दाखवावी, ही नम्र विनंती.

# कौसडी गावात गोवंश हत्येने खळबळ!

## ११ बैलांची कत्तल उघडकीस ७.४५ लाखांचा मुद्देमाल जप्त




**अक्षराज : जाफर शेख**

**दि.३१, बोरी (परभणी) :** बोरी जवळच असलेल्या कौसडी गावात गोवंश हत्येची माहिती मिळाल्यानंतर बोरी पोलिसांनी शनिवारी दुपारी धाड टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत ७ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून अब्दुल रहेमान अब्दुल करीम कुरेशी व त्यांच्या पत्नीविरुद्ध विविध कायद्यांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कौसडी बसस्थानक परिसरात पेट्रोलिंग सुरू असताना गुप्त माहितीदारामार्फत संबंधित व्यक्ती त्यांच्या राहत्या घरी गोवंश हत्या करीत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानंतर पोलिस पथकाने पंचांच्या उपस्थितीत दुपारी सुमारे १२.३० वाजता संबंधित ठिकाणी छापा टाकला.

छाप्यात एक जिवंत गाय, एक जिवंत बैल, ११ बैलांचे अवशेष, गोवंश वाहतुकीसाठी वापरले जाणारे टाटा छोटा हत्ती वाहन तसेच कत्तलीसाठी वापरले जाणारे हत्यार असा एकूण ७.४५ लाख रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. सर्व मुद्देमाल पंचनामा करून जप्त करण्यात आला.

यावेळी संशयितांनी पोलिसांना पाहताच घटनास्थळावरून पळ काढल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता (इछड), प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायदा तसेच महाराष्ट्र पशू संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.ही कारवाई बोरी येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार राजेश जटाळ, हेड कॉन्स्टेबल सिद्धार्थ कोकाटे, पोलीस शिपाई प्रकाश मोरे तसेच इतर कर्मचाऱ्यांनी केली.

# २५ वर्षांनी पुन्हा रंगल्या शाळेच्या आठवणी!

## लो.टि. कन्या विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा संपन्न



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३१, चंद्रपूर :** लोकमान्य टिळक स्मारक मंडळ चंद्रपूर द्वारा संचालित लोकमान्य टिळक कन्या विद्यालयात शाळेतील १९९९ ते २०१० या बॅचमधील माजी विद्यार्थिनींचा भव्य स्नेहमेळावा नुकताच शाळेच्या प्रांगणात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. तब्बल २५ वर्षांनंतर एकत्र आलेल्या विद्यार्थिनींनी जुन्या आठवणींना उजाळा देत आनंदोत्सव साजरा केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी पर्यवेक्षक वासुदेव काळे हे होते तर मंचावर उपस्थितांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना दुर्गापुरोहित, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य डॉ. राम भारत, माजी मुख्याध्यापिका साधनकर, जया भारत, धानोरकर, पर्यवेक्षिका प्रांजली महादाणी यांची उपस्थिती होती. तसेच माजी मुख्याध्यापिका संध्या बडकेलवार, कु. श्रीरामे व माजी शिक्षक- शिक्षिका उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका अर्चना दुर्गापुरोहित यांनी केले. यानंतर शिक्षकांचे सुंदर गीतांच्या सुरावटीत व टाळ्यांच्या कडकडाटात मंचावर स्वागत करण्यात आले. शिक्षक व विद्यार्थिनींनी सादर केलेल्या शाळेच्या गीतांनी संपूर्ण वातावरण भावनिक व उत्साही बनले. यानंतर माजी विद्यार्थिनी वैदेही थोटे हिने शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारे मनोगत मांडले. आपल्या भाषणात तिने शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिलेली शिस्त, संस्कार, चांगले वर्तन तसेच योग्य करिअर मार्गदर्शन याबद्दल भावना व्यक्त केल्या. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थी आपल्या ध्येय आणि योग्य मार्गापासून कधीही विचलित होत नाहीत, असे तिने सांगितले. तिच्या भाषणामुळे उपस्थितांच्या मनात शालेय जीवनातील अनेक आठवणी पुन्हा जाग्या झाल्या. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष वासुदेव काळे यांनी विद्यार्थिनींना भविष्याच्या वाटचालीसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी जीवनात प्रामाणिकपणा, मेहनत आणि संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमात माजी तसेच विद्यमान शिक्षकांचा रोपटं व पुस्तके देऊन विशेष सत्कार करण्यात आला. तसेच प्रत्येक बॅचच्या माजी विद्यार्थिनींची त्यांच्या आवडत्या गीतांवर रंगतदार एन्ट्री करण्यात आली. विद्यार्थिनींना त्यांच्या आवडत्या शिक्षकांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

संपूर्ण कार्यक्रमात विविध खेळ, नृत्य, फोटोबूथवर छायाचित्रे काढणे तसेच स्वादिष्ट भोजनाचा सर्वांनी मनमुराद आनंद घेतला. कार्यक्रमात आपुलकी, मैत्री आणि जुन्या आठवणींचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन डॉ. योगेश्वरी त्रिपुरवार यांनी केले. त्यांना कल्पना राजूरकर, अपूर्वा गोंधळेकर, पूजा गाडगे, प्रियांका गडपल्लीवार, प्रज्योती दुर्गापुरोहित, नेहा पडगेलवार, प्रिती निंभोरकर, ॲड. रुपाली शेगामवार, निलिमा ठावरी, सरला गेडाम, रश्मी बच्चुवार, राणी डाखोरे आदी मुख्य टीम सदस्यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपूर्वा गोंधळेकर व कल्पना राजूरकर यांनी केले. शेवटी डॉ. योगेश्वरी त्रिपुरवार यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

# नितीन शहा यांचा अहिल्यादेवी होळकर सामाजिक गौरव पुरस्कार देऊन सन्मान



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.३१, माथेरान :** सामाजिक क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करून समाजहित जपणारे नितीनजी शहा यांना नुकताच अहिल्यादेवी होळकर सामाजिक गौरव पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. या प्रसंगी विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरस्कार प्रदान समारंभात मा. नितीनजी शहा यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ तसेच स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. समाजसेवेतील त्यांचे योगदान, जनसामान्यांच्या प्रश्नांबाबतची संवेदनशीलता आणि विविध सामाजिक उपक्रमांमध्ये घेतलेला सक्रिय सहभाग याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

यावेळी अध्यक्ष राकेश कोकळे, उपाध्यक्ष जानू आखाडे, सचिव करण जानकर, खजिनदार आकाश ढेबे, सदस्य संतोष आखाडे, तुकाराम आखाडे, प्रवीण बावदाने, शैलेश ढेबे, पंकज कोकरे, नगरसेविका सौ. लता ढेबे, महिला अध्यक्ष रेखा ढेबे, सुशीला जानकर, संतोष ढेबे, ज्येष्ठ नागरिक रामा आखाडे, चिमा आखाडे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी नितीनजी शहा यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या पुढील सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. समाजसेवेची त्यांची निष्ठा, तळमळ आणि जनहिताची भावना अशीच वृद्धिंगत होत राहो, हीच राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या चरणी प्रार्थना व्यक्त करण्यात आली.या सन्मानाबद्दल विविध स्तरातून मा. नितीनजी शहा यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, सामाजिक कार्यासाठी मिळालेला हा गौरव अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# पारनेर बाजार समितीत सुजित झावरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचा एल्गार



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, पारनेर (अहिल्यानगर) :** राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी अभूतपूर्व आर्थिक संकटाचा सामना करत असताना केंद्र सरकारने नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी नाफेडमार्फत प्रतिकिलो १५.८० रुपये दराने कांदा खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र हा निर्णय केवळ एका जिल्ह्यापुरता मर्यादित ठेवण्यात आल्याने अहिल्यानगरसह राज्यातील इतर कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर पारनेर तालुका शिवसेनेच्या वतीने पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याचे लिलाव बंद पाडत जोरदार आंदोलन करण्यात आले.

शिवसेना नेते जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात शेकडो शेतकरी सहभागी झाले होते. आंदोलनकर्त्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत कांद्याला न्याय्य दर मिळाल्याशिवाय संघर्ष अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला.

एकीकडे कांद्याचे भाव कोसळत असताना दुसरीकडे व्यापारी आणि दलाल मात्र नफा कमवत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. शेतकरी मात्र आपल्या मालाला योग्य भाव मिळत नसल्याने हवालदिल झाला आहे.

आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन पाठविण्यात आले असून तहसीलदार यांना याची प्रत देण्यात आली आहे. बाजार समितीच्या वतीने सभापती गंगाराम बेलकर, उपसभापती संदीप सालके व संचालक रा. या. औटी यांनी निवेदन स्वीकारले आहे. निवेदनात राज्यातील सर्व कांदा उत्पादक जिल्ह्यांमध्ये नाफेड खरेदी केंद्र सुरू करावीत, कांद्याला किमान २० रुपये प्रति किलो दर द्यावा आणि शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी विशेष मदत जाहीर करावी अशी मागणी करण्यात आली. यावेळी सरपंच डॉ. कोमल भंडारी, तालुकाप्रमुख शिवसेना पारनेर अरुण ठाणगे, युवा नेते अमोल साळवे, महेंद्र पांढरकर सतीश पिंपरकर, रुपेश ढवण, राहुल तामखडे, संदिप औटी यांच्यासह अनेक पदाधिकारी व कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शेतकरी संकटाच्या खाईत, सरकार मात्र मौन?**

कांद्याचे उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांना बियाणे, खते, औषधे, मजुरी, वीज आणि वाहतूक यावर प्रचंड खर्च करावा लागतो. मात्र बाजारात कांद्याला मिळणारा दर उत्पादन खर्चापेक्षाही कमी असल्याने शेतकऱ्यांच्या हातात काहीच राहत नाही. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून पीक घेतले असून आता बाजारातील पडलेल्या भावामुळे त्यांच्यावर आर्थिक संकट कोसळले आहे. यासाठी शेतकऱ्यांच्या कांद्याला योग्य भाव मिळावा अशी मागणी यावेळी सुजित झावरे पाटील यांनी केली.

**आता आरपारची लढाई**

कांद्याचे भाव कोसळले की शेतकरी आठवतो आणि भव वाढले की निर्यातबंदी केली जाते. मग शेतकऱ्याने जगायचं कसं?

आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांनी स्पष्ट शब्दात इशारा दिला की, शासनाने तात्काळ निर्णय घेतला नाही तर आगामी काळात तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल. बाजार समित्या बंद पाडण्यापासून ते रस्त्यावर उतरून संघर्ष उभारण्याचा निर्धार शेतकऱ्यांनी व्यक्त केला.

# मराठा आरक्षणाचा प्रश्न तातडीने मार्गी लावा!


## खा.बजरंग सोनवणे यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विखे-पाटील यांना थेट पत्र

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.३१, बीड :** मराठा समाजाच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी सातत्याने संघर्ष करणारे मनोजदादा जरांगे-पाटील यांनी आजपासून रखरखत्या उन्हात पुन्हा एकदा उपोषणाचे हत्यार उपसले आहे. त्यांच्या या आंदोलनामुळे राज्यातील कोट्यवधी मराठा बांधवांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले असून, राज्य सरकारने आता कोणताही वेळ न दवडता यावर तातडीने आणि सकारात्मक तोडगा काढावा, अशी मागणी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना थेट पत्र पाठवून प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

खा. बजरंग सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे की, मराठा समाजाच्या आरक्षणासह इतर प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मनोजदादा जरांगे-पाटील हे दीर्घकाळापासून शांततेच्या व लोकशाही मार्गाने लढा देत आहेत. त्यांच्या मागण्या मराठा समाजाच्या भावना आणि अपेक्षांशी थेट निगडित आहेत. मात्र, गेल्या अनेक महिन्यांपासून या मागण्यांवर राज्य सरकारकडून अपेक्षित निर्णय न झाल्यामुळे संपूर्ण मराठा समाजामध्ये तीव्र अस्वस्थता आणि कमालीची नाराजी वाढत असल्याचे खा. सोनवणे यांनी पत्रात नमूद केले आहे.

सध्या उन्हाचा कडाका प्रचंड वाढला असून, अशा रखरखत्या उन्हात मनोजदादा जरांगे-पाटील यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे.



या उपोषणामुळे त्यांच्या प्रकृतीवर अत्यंत विपरीत परिणाम होण्याची मोठी शक्यता निर्माण झाली आहे. मनोजदादांच्या आरोग्याबाबत राज्यातील कोट्यवधी मराठा बांधव-भगिनी कमालीचे चिंतित आहेत. त्यामुळे राज्य सरकारने या विषयाची तातडीने गंभीर दखल घेऊन मनोजदादांशी सकारात्मक संवाद साधावा, त्यांच्या मागण्यांवर योग्य तो निर्णय घ्यावा आणि सुरू असलेल्या उपोषणाचा कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी आग्रही विनंती खासदारांनी केली आहे.

पत्राच्या शेवटी खा. बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्र्यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास व्यक्त केला आहे. आपण एक संवेदनशील आणि जनहितकारी मुख्यमंत्री म्हणून या अत्यंत संवेदनशील प्रश्नाकडे प्राधान्याने लक्ष द्याल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. सरकार यावर नक्कीच न्याय्य मार्ग काढून समाजामध्ये विश्वासाचे व सकारात्मक वातावरण निर्माण करेल, अशी आशा खा. सोनवणे यांनी पत्राद्वारे व्यक्त केली

# मानवीसाखळी 'भर पावसात' शहापूरकर ऊतरले रस्त्यावर

**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.३१, शहापूर (ठाणे) :** सर्वत्र तापमानवाढीचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे, धरणांचा तालुका, घनदाट जंगल असलेला तालुका अशी ओळख असलेल्या शहापूर चे तापमान देखील गेल्या काही वर्षांपासून वाढत चालले आहे यंदा तर शहापूरचा पारा पंचेचाळीस - शेचाळीशीच्या अंशा पर्यंत पोहचला, आणि वाढत्या तापमानाबाबत गंभीर उपाययोजना करणे ही काळाची गरज ओळखून शहापूर मधे शहापूर पर्यावरण रक्षण मंचा ची स्थापना करण्यात आली.

या मंचातर्फे खासदार, नगरपंचायत प्रशासन यांच्या सोबत बैठक झाली आणि पर्यावरण रक्षणासाठी संयुक्त प्रयत्न केले जावे याबाबत चर्चा करण्यात आली. त्याच बरोबर या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन या मधे नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी रविवारी मानवी साखळी ऊभारण्यात आली. रविवारी सकाळी आठ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक ते शिवस्मारक अशी मानवी साखळी ऊभारण्यात आली यावेळी शहापूर मधील अबाल वृद्धांसह शहापूरातील डॉक्टर, ईंजिनियर, वकिल, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, संघटना, समाजातील विविध मान्यवरांपासुन सामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सहभागी झालेल्यांनी 'झाडे लावा पाणी जिरवा' असा संदेश देणारी टोपी घातली होती.

त्याच बरोबर अनेकांनी पर्यावरणाचा संदेश देणारी वेषभूषा परिधान केली होती या मधे वसंत भेरे यांनी घातलेले जाकिट सर्वांचे लक्ष वेधून घेतले तर बच्चे कंपनी देखील विविध वेषभूषा करुन हातात फलक घेऊन ऊपस्थित होते. यावेळी डॉ. राजेश वेखंडे यांनी तोंडाला ऑक्सिजन मास्क लावून झाड हातात घेऊन सायकल चालवा, प्रदुषण टाळा, पर्यावरण वाचवा, झाडे वाचवा




ऑक्सिजन मिळवा असा संदेश दिला. झाडे वाचवा, पाणी जिरवा, हिरवागार शहापूर आपली जबाबदारी, आज जर नाही जागलो तर ऊद्या शहापूर ऊष्णतेने होरपळणार, झाडे लावा झाडे जगवा शहापूर सुझलाम सुफलाम करा, असे पर्यावरण संदेश देणारे फलक अनेक नागरिकांनी हाती घेतले होते. यात एक चिमुकली तोंडाला मास्क लावून माझा श्वास अडकला असा संदेश देत होती. या मानवीसाखळी मधे महिलांनी देखील मोठ्याप्रमाणावर सहभाग घेतला. तापमानवाढीचे गांभीर्य लक्षात घेऊन संतोष शिंदे आणि त्यांचे सहकारी हे शहापूर पर्यावरण रक्षण मंचा च्या माध्यमातून प्रयत्न करत आहेत, मंचाच्य वतीने या मानवी साखळीचे आयोजन करण्यात आले होते.संतोष शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी घरोघरी जाऊन पर्यावरणाचे महत्त्व पटवून देत मानवी साखळी मधे सहभागी होण्याचे आवाहन केले. मानवी साखळी आयोजनात पोलीस प्रशासन, शासन-प्रशासन यांचे सहकार्य लाभले. संतोष शिंदे यांनी मानवी साखळी मधे सहभागी झालेल्या तसेच सहकार्य केलेल्यांचे आभार मानले आणि मानवी साखळीची सांगता झाली. विशेष म्हणजे या वेळी वरूणराजाने देखील हजेरी लावली मात्र भरपावसात देखील मानवीसाखळी ऊभी राहीली.

# ग्रामपंचायतींची आरक्षण निश्चित करतांना ५० टक्क्यांची मर्यादा पाळावी लागणार!

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, अहिल्यानगर :** जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत मुदत संपणार्या तसेच नव्याने स्थापन झालेल्या ग्राम पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील ७७१ ग्राम पंचायतींची अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात आली. आता ग्रामपंचायतीमध्ये जागांचे आरक्षण निश्चित करताना ते ५० टक्क्याच्या आतच ठेवावे लागणार आहे, त्याबाबतचा आदेश राज्य निवडणूक आयोगाने दिला आहे. त्यानुसार १२ जूनला विशेष ग्रामसभेद्वारे आरक्षण प्रक्रिया राबवली जाणार आहे.

जिल्ह्यातील ७७१ ग्रामपंचायतींच्या प्रभाग आरक्षणाचा अहवाल जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी शासनाकडे पाठवला. त्यानंतर आरक्षण प्रक्रिया निश्चित होते. ती करण्यासाठी निवडणूक आयोगाने सविस्तर आदेश दिला आहे. त्यानुसार आरक्षण निश्चित करण्याचे सूत्र राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी ठरवून दिले आहे. अनुसूचित जाती, जमातींसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात जागा आरक्षित केल्या जाणार आहेत.

विशेष म्हणजे, एखाद्या प्रभागात शून्य लोकसंख्या असली तरीही त्या ठिकाणी जागा आरक्षित ठेवण्याचा विचार केला जाणार आहे. नागरिकांच्या मागासप्रवर्गाच्या जागा २७ टक्क्यांच्या आता ठेवण्यासाठी सात सदस्य असलेल्या ग्रामपंचायतींमध्ये जागांची टक्केवारी १.८९ असली तरी एकच जागा राखीव होणार आहे. तर ९ सदस्यांच्या ग्रामपंचायतींमध्ये २.४३ च्या तुलनेत दोन जागा, ११ सदस्यीय ग्रामपंचायतींमध्ये २.९७ च्या तुलनेतही दोनच जागा, १३ सदस्यीय ग्रामपंचायतींमध्ये ३.५१ च्या तुलनेत ३ जागा, १७ सदस्यीय ग्रामपंचायतींमध्ये ४.५९ च्या तुलनेत ४ जागा राखीव ठेवल्या जाणार आहेत.

**आरक्षण सोडत कार्यक्रम :**

८ जून - विशेष ग्रामसभा, सूचना देणे
१२ जून - विशेष ग्रामसभा, आरक्षण सोडत
१७ जून - प्रभाग निहाय आरक्षण प्रारूप अधिसूचनेला जिल्हाधिकाऱ्यांनी मान्यता देणे
१९ जून - प्रभाग निहाय आरक्षण प्रारूप प्रसिद्ध
१९ ते २५ जून - आरक्षण निश्चितीबाबत हरकती आणि सूचना दाखल कालावधी
३ जुलै - उपविभागीय अधिकाऱ्यांची प्राप्त हरकतींवर अभिप्राय देणे
८ जुलै - उपविभागीय अधिकारी यांचा अभिप्राय विचारात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी अंतिम अधिसूचनेस मान्यता देणे
१० जुलै - जिल्हाधिकाऱ्यांनी मान्य केलेल्या अंतिम प्रभाग रचनेस प्रसिद्धी

**टक्क्यांच्या मर्यादेसाठी अपूर्णांकाला फाटा...**

एकूण आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या पुढे जात असल्यास नागरिकांच्या मागास वर्गाच्या जागा कमी कराव्यात. तसेच एकूण आरक्षण ५० टक्के व नागरिकांच्या मागास प्रवर्गाचे आरक्षण २७ टक्क्यांच्या आत ठेवण्यासाठी अपूर्णाक दुर्लक्षित करण्याचे निर्देश दिले आहेत.

# दक्षिण सोलापूर तालुक्यातील गुणवंत विद्यार्थी होणार 'एक दिवसाचे सरपंच'

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.३१, सोलापूर :** 'आजचा विद्यार्थी, उद्याचा लोकप्रतिनिधी' या संकल्पनेतून दक्षिण सोलापूर तालुक्यात एक कौतुकास्पद शैक्षणिक प्रयोगाला सुरुवात झाली आहे. नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा आणि ५ वी व ८ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना थेट आपल्या गावचे 'एक दिवसाचे प्रतिकात्मक सरपंच' होण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण आणि प्रशासकीय कामाची आवड निर्माण व्हावी, यासाठी हा उपक्रम हाती घेतल्याची माहिती गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी दिली.

हा उपक्रम दरवर्षी ४ जून रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळेत राबवला जाईल. या दिवशी यशस्वी विद्यार्थ्यांची गावातून वाजत-गाजत मिरवणूक

काढून त्यांना सन्मानपूर्वक सरपंच पदाच्या खुर्चीवर बसवले जाईल. त्यांना ग्रामपंचायतीच्या कामकाजाची प्रत्यक्ष माहिती देऊन मार्गदर्शन केले जाईल. बालसरपंचांना गावातील शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, अंगणवाड्यांना भेटी देऊन सुधारणा सुचवण्याची मुभा असेल.

त्यांनी सुचवलेल्या बाबींची नोंद ग्रामविकास अधिकारी स्वतंत्रपणे ठेवून ती गटविकास अधिकारी कार्यालयाकडे पाठवतील. हा पूर्णपणे शैक्षणिक प्रयोग असल्याने बालसरपंचांना कोणतेही प्रशासकीय किंवा आर्थिक अधिकार नसतील आणि त्यांचे निर्णय प्रशासनावर बंधनकारक नसतील. या

**हे विद्यार्थी अनुभवणार गावचा कारभार**

**आठवी शिष्यवृत्तीधारक :**

अलिया मुल्ला (निंबर्गी), आसावरी महिमकर (अंत्रोळी), साक्षी भैरामडगी (वळसंग), समृद्धी हुक्केरी (येळेगाव), सर्वेश बिराजदार (खानापूर), पाचवी शिष्यवृत्तीधारक ओजस हुक्केरी (येळेगाव), अमित चव्हाण (चापला वस्ती), सिमरन बागवान (आहेरवाडी), अहमद शेख (आहेरवाडी), सुपिया मकानदार (आहेरवाडी), नवोदय विद्यालय प्रवेश मिळवणारे विद्यार्थी : अमित चव्हाण (चापला वस्ती), रोहिणी कुंभार (मंद्रूप)

सुचवलेल्या बाबींची नोंद

दिवशी यशस्वी विद्यार्थ्यांसह त्यांचे शिक्षकं, मुख्याध्यापक व पालकांचाही सत्कार होईल. तसेच खुर्चीवरील फोटोची प्रत त्याच दिवशी विद्यार्थ्याला भेट दिली जाईल. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत

पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम होत आहे. हा उपक्रम प्रभावीपणे राबवून त्याचा संक्षिप्त अहवाल आणि छायाचित्रे

पंचायत समिती कार्यालयाला सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. उपक्रमातून उद्याचे लोकप्रतिनिधी तयार व्हावेत. त्यांना नागरिकशास्त्राचे धडे फक्त पुस्तकातून न देता प्रात्यक्षिकाद्वारे मिळावे यासाठी हा उपक्रम आहे.

# थोडक्यात

## अवजड वाहनांचे वाहतूकीमुळे देव्हारे येथील राज्यमार्गावरील पुल बनला धोकादायक

**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.३१, दापोली (रत्नागिरी) :** मंडणगड तालुक्यात पाच वर्षापासून सुरु असलेल्या बॉक्साईडचे अवजड वाहनांचे वाहतूकीमुळे बाणकोट पंढरपूर राज्य मार्ग पंधरा वर देव्हारे बौध्दवाडी नजीक सार्वजनीक बांधकाम विभागाचे ताब्यात असलेला जुना पुल सद्यस्थितीत धोकादायक बनला आहे. पावसाचे आपत्तकालीन परिस्थितीत पुलाचे नुकसान झाल्यास देव्हारे, वेसवी बाणकोट पंचक्रोशीतील अनेक गावांचे तालुक्याचे ठिकाणीशी असलेला संपर्क तुटण्याची मोठी शक्यता आहे. सार्वजनीक बांधकाम विभागाने या पुलाचे डागडुजीकडेचे वेळीच लक्ष देण्याची मागणी परिसरातू केली जात आहे.




देव्हारे बौध्दवाडी नजीक मोठ्या ओढ्यावर असलेला पुलाचे दोन्ही पिलर स्टील बाहेर पडले आह येथे पाण्याचा प्रवाह मोठा असल्याने पिलरची झिज झाली आहे याशिवाय या ठिकाणी ओढ्याचे जवळचे परिसरात अनेक फेरबदल झाले आहेत त्यामुळे पुर्वी पुलाखालून सहज जाणारे पाणी यंदा पिलरचे खांबेचे परिसरात दीर्घकाळ साठून राहण्याची शक्यता वाढलेली असल्याने भविष्यातील धोका लक्षात घेऊन सार्वजनीक बांधकाम विभागाने प्रमुख राज्यमार्गावरील पुलाचे नव्याने निर्माण झालेल्या समस्याकडे लक्ष देण्याची मागणी परिसरातून केली जात आहे.

## संग्राम गरड यांची मुंबई पोलिस दलात निवड

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.३१, पंढरपूर :** मोहोळ येथील संग्राम (राज) निलेश गरड यांची मुंबई पोलीस दलात निवड झाली आहे. या निवडीनंतर मोहोळ परिसरातून राज व त्यांच्या परिवारावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



राज गरड यांचे मुंबई पोलिस पदी निवड झालेबद्दल महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष राजन (मालक) पाटील, लोकनेते कारखान्याचे चेअरमन बाळराजे पाटील, यांचेसह तुंगत ता. पंढरपूर ग्रामपंचायत मा. सरपंच आगतराव (मास्तर) रणदिवे, ॲड. विनायक सरवळे, बाळु काका आंध, अच्युत रणदिवे, यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. मोहोळ परिसरातून त्यांचे निवडीचे स्वागत केले जात आहे.

## पट्टेदार वाघाच्या हल्लयात, बकऱ्या चारणारा शेरखी ठार



**अक्षराज : नितीन पाटील**

**दि.३१, चिमूर :** तळोधी वनपरिक्षेत्र अंतर्गत येत असलेल्या चिमूर तालुक्यातील मोटेगाव येथील कक्ष क्रमांक ३८ मध्ये बकऱ्या चारायला गेलेल्या शेरख्याला पट्टेदार वाघाने हल्ला करून जागेवरच ठार केल्याची घटना ३१ मे ला सकाळी १० वाजता दरम्यान घडली .

मोटेगाव येथील दिलीप जानबा ननावरे वय ४५ वर्षे हे नेहमी प्रमाणे आपल्या स्वतःच्या घरच्या शेंड्या मोटेगाव ते पेंढरी मार्गावारील बद्री पहाडीच्या खाली कक्ष क्र ३८मध्ये सकाळीच चारण्यासाठी गेले असता जंगलात दबा धरून असलेल्या पट्टेदार वाघाने हल्ला चढवीत नन्नावरे यांना जागेवरच ठार केले. आणि ५०० मीटर दूर ओडीत नेऊन संपूर्ण कपडे फाडून जंगलात काढलेली लाईन वर नेऊन ठेवले सदर घटना सकाळी १० वाजता दरम्यान घडली.

सदर घटनेत वाघाने हल्ला केला तेव्हा १५ ते २० च्या संख्येनी असणाऱ्या शेंड्या सैरावैरा पडाल्या आणि घरी परत आल्या सदर शेंड्या घरी परत आल्या मात्र वडील घरी आले नाही म्हणून मुलाने वडिलांना फोन केला पण उत्तर आले नाही .तेव्हा मुलगा काही लहान मुलांना घेऊन जंगल परिसरात वडिलांना शोधायला गेले असता घटनास्थळी त्यांना वडिलांचे फाटलेले कपडे आणि कुऱ्हाड आढळून आली तेव्हा सर्व मुले गावात पळत आले आणि घटनेचा सविस्तर वृत्तात गावात सांगितले तेव्हा गावातील तरुण मुले आणि गावकऱ्यांनी घटनास्थळा कडे धाव घेतली आणि संपूर्ण परिसर पिंजून काढले असता मृत्यूदेह घटनास्थळावरून ५०० मीटर दूर अंतरावर आढळुन आला .तेव्हा ही घटना उघडीस आली.

सदर वाघ हा सकाळी ८ वाजता दरम्यान त्याच परिसरात असणाऱ्या रोपवाटिकेला पाणि टाकणाऱ्या महिला मजुरांना रस्ता ओलांडतांना दिसला तर काही रहदारी करणाऱ्या नागरिकांना सुद्धा तो जंगलात जाताना दिसला सदर घटनेची माहिती वनविभागाला मिळताच तात्काळ ए सी एफ महेश गायकवाड ,वनपरिक्षेत्र अधिकारी अनुप कन्नमवार ,आरओ तोडासे,वनरक्षक केशव पाटील,वनरक्षक एन आळणे,वनरक्षक संभाजी वडजे, वनरक्षक बाळकृष्ण नागरे आणि वनविभागाची संपुर्ण चमु घटनास्थळी दाखल झाली तसेच चिमूर पोलीस ठाण्याचे पथक दाखल झाले पंचनामा करून पुढील तपास सुरू आहे सदर प्रेत उपजिल्हा रुग्णालयात उत्तरणीय तपासणीसाठी पाठविण्यात आले मृतक ननावरे यांची परिस्थिती खूपच हलाखीची असून अल्पप्रमानात कोरडवाहू जमीन असून त्यांच्या मागे एक मुलगा ,मुलगी आणि पत्नी आहे या घटनेमुळे मोटेगाव परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे .तेव्हा तात्काळ उपाययोजना करून वाघाचा बंदोबस्त करावा अशी ग्रामस्थांकडून मागणी होत आहे.